# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**


जा. क्र. : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी/२०१८-१९/२०१९/380 दिनांक : २१/१/२०१९

प्रति
संचालक /प्राचार्य
पुणे विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

विषय : आपले सरकार डी बी टी पोर्टल वरील महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती योजना २०१८-१९

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्रमांक १८/तंशिस/डी बी टी/२०१८/३६० दिनांक ११/१०/२०१८.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/महाडिबीटी/२०१८/४३६९ दिनांक ११/१०/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग (डी. आय. टी.) यांचेकडून आपले सरकार डी बी टी पोर्टल (संकेतस्थळ **http:mahadbtmahait.gov.in**) बनविण्यात आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्तायोजना.
३. उच्च व व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेण-या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्याकरीता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

उपरोक्त योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने उपरोक्त संदर्भ क्र १ चे पत्रामध्ये मा संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत आपणास या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र २ व्दारे कळविण्यात आलेले होते.

तथापी अनेक संस्थांनी विद्यार्थ्याकडून ऑन लाईन अर्ज भरुन घेवून ते पडताळणी करुन पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयाकडे ऑनलाईन पाठविलेले नाहीत. त्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी संदर्भ क्र २ चे पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार संस्थेच्या लॉगइनमध्ये (क्लार्क व प्राचार्य) प्रलंबीत असलेल्या अर्जाची पडताळणी करुन परिपूर्ण अर्ज पुढे पाठवावेत तसेच अपूर्ण व आवश्यक मूळ कागदपत्रे अपलोड न केलेले अर्ज फेटाळण्यात **(Reject)** यावेत. सदरची कार्यवाही प्राधान्याने करुन संस्थेच्या लॉगीनमध्ये एकही ऑन लाईन अर्ज प्रलंबीत रहणार नाही याची दक्षता घ्यावी. **तसेच अपूर्ण कागदपत्रामुळे जे अर्ज विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात आलेले आहेत अशा अर्जावर तात्काळ कार्यवाही करावी.**

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत — प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.